**नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०२५ मधील**

**निशाणी क्रमांक ५ व २६ खालील संयुक्त आदेश**

[CNR NO MHWS050001502025]

१) वादी यांच्या तर्फे प्रस्तुतचे तात्पुरत्या मनाईचे अर्ज निशाणी क्र. ५ व २६ हे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ३९, नियम १ व २ नुसार प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द तात्पुरती मनाई मिळणेसाठी दिलेले आहेत.

२) प्रस्तुतचे मनाईचे दोन्ही अर्ज वाचले. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी निशाणी क्र. ३८ अन्वये, दिलेला त्यांचा लेखी जबाब व दोन्ही मनाईच्या अर्जाचे म्हणणे विचारात घेतले. निशाणी क्र. १ खालील दिनांक २३.७.२०२५ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. ३ ते ५, ७ व ८ यांच्या लेखी जबाबाविना आणि प्रतिवादी क्र. ६ व ९ यांच्याविरुध्द एकतर्फा चाललेला आहे. वादींनी कागदपत्राची यादी निशाणी क्र.४,२८,४८ व ५० आणि प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कागदपत्रांची यादी निशाणी क्र.४९ अन्वये वेळोवेळी दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेतली.

३) वादी यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. ए. एस. बेरिया यांचा आणि प्रतिवादी १ व २ यांचेतर्फे विधीज्ञ श्री. एम.व्ही. येवले यांचा युक्तिवाद ऐकला असता, माझे विचारार्थ खालील मुद्दे निघाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे,

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १] | वादींना प्रथमदर्शनी केस आहे काय? | नकारार्थी |
| २] | वादींच्या हक्कात न्यायाचा समतोल आहे काय? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३] | तात्पुरता मनाई हुकूम न दिला तर वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय? | नकारार्थी |
| ४] | काय आदेश? | ...अंतिम आदेशानुसार. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत :–**

४) वादींच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, मौजे चिखलागड, येथील गट क्र. १८७ यामध्ये वादी क्र. १ हिची ०हे. ८८आर, वादी क्र. २ यांची २ हे. ० आर आणि वादी क्र. ३ यांची २ हे. ० आर अशा जमिनी आहेत व त्यांच्या चतुःर्सिमा दाव्यातील परिच्छेद क्र. १ मध्ये नमुद केल्या प्रमाणे आहेत. त्या दावा मिळकती वादींच्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या जमिनी सुध्दा त्याच गट क्र. १८७ मध्ये आहेत परंतू प्रतिवादी क्र. १ व २ यांचा रस्ता हा वादींच्या दावा मिळकतीला लागून नाही. प्रतिवादी यांनी त्यांच्या लेखी जबाबातील परिच्छेद क्र. १५ मध्ये नमुद केलेल्या रस्त्याचा ते वापर करत होते, असे नमुद केले आहे परंतू प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी व इतर यांच्या विरुध्द दिनांक २८.६.२०२१ रोजी मामलतदार अधिनियम १९०६ मधील कलम ५ नुसार मामलतदार मंगरुळपीर यांच्याकडे अर्ज दिला. परंतू प्रतिवादी यांनी दिनांक २३.१.२०२४ रोजीचा आदेश दिनांक १०.८.२०२२ रोजीचा सुधारीत आदेश आणि दिनांक ४.१.२०२२ रोजीचा आदेश हे सर्व आदेश दाखल केलेले नाहीत.

५) वादींच्या विधीज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ व२ यांचा रस्ता प्रतिवादी क्र. ३ व ४ अडवित होते व त्यांच्यामध्ये वाद होता व ते वादींना त्रास देत होते त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. दिनांक २३.११.२०२१ रोजीच्या स्थळनिरीक्षण अहवालानुसार प्रतिवादी क्र. १

व २ यांना गट क्र. १८७ मधून रस्ता नाही. दिनांक २३.०१.२०२४ रोजीच्या मामलतदार यांच्या आदेशानुसार तो रस्ता वादींचा हा खाजगी रस्ता आहे, मग प्रतिवादी क्र. १ व २ हे त्या रस्त्याने कसे काय जावू शकतील ? परंतू दिनांक १८.३.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्याशी संगणमत करुन वादींच्या शेतीचा बांध फोडून टॅक्टर लावून बांधाचे गोटे बाहेर नेवून जेसीबीव्दारे १० फुटाचा शेतीचा बांध फोडून नवीन रस्ता तयार करण्याचे कृत्य केले आहे त्यामुळे प्रतिवादी क. १ ते ४ यांनी वादींच्या शेतीच्या बांधावरुन कोणत्याही प्रकारचा नवीन रस्ता करु नये म्हणून प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याविरुध्द तात्पुरती मनाई देण्यात यावी.

६) याउलट प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ व २ यांची गट क्र. १८७ मध्ये प्रत्येकी १ हे. २० आर इतकी जमीन आहे. अशा रितीने प्रतिवादी क्र. १ व २ हे २ हे. ४० आर या जमिनीची वहिवाट करतात. वादी व प्रतिवादी हे एकमेकांच्या भावकीतील आहेत. दिनांक २२.२.१९९६ रोजी विठठल जाधव यांच्याकडून भवरीलाल जाधव यांनी रक्कम रुपये ७१,०००/- ला २ हे. २० आर इतके क्षेत्र विकत घेतले. तसेच दिनांक २२.२.१९९६ रोजीच्या खरेदी खतानुसार गट क्र. १८७ मधील ३८ आर इतकी जमीन शामराव जाधव यांच्याकडून विकत घेतली आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिनांक २८.६.२०२१ रोजी मामलतदार मंगरुळपीर यांच्याकडे मामलतदार कोर्ट कायदयाच्या कलम ५ प्रमाणे अर्ज दिला. दिनांक २३.११.२०२१ रोजी स्थळनिरीक्षण अहवालानुसार गट क्र. १८७ मधून रस्ता असल्याचे दिसून येते. त्यावेळेस दोन रस्ते मागीतले होते त्यामुळे दिनांक ४.१.२०२२ रोजीचा आदेश अंशतः मंजूर झालेला आहे.

७) प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विधिज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी हे संबंधीत रस्ता हे १९९६ पासून वापरत होते. दिनांक १०.८.२०२२ रोजी दक्षिण आणि पुर्व अशी दिशांची दुरुस्ती करुन सुधारित

आदेश तहसिलदार मंगरुळपीर यांनी पारीत केला. दाव्यातील परिच्छेद क्र. १ मध्ये उत्तर दिशेस प्रतिवादी क्र. १/सरकारी रस्ता असे वादींनी स्वतः नमुद केलेले आहे. दिनांक २७.४.२०२३ रोजीच्या पंचनाम्यानुसार पोलीस संरक्षणामध्ये रस्ता खुला केला गेला. पोलीस स्टेशन आसेगाव यांच्याकडे दिनांक १७.५.२०२२ रोजी रक्कम ₹ १७,३९५/– आणि दिनांक २७.४.२०२३ रोजी रक्कम ₹ १६,४२३/– इतकी रक्कम शेती रस्ता मोकळा करण्याकरीता पोलीस बंदोबस्त मिळावा म्हणून भरली होती, त्या पावत्यांच्या छायांकीत प्रती या दाव्यात दाखल केलेल्या आहेत. पोलीसांनी तो रस्ता मोकळा करून देवूनही वादी हे प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्या रस्त्याने जावू देत नव्हते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ अरविंद जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून वादी क्र. १ ते ३ यांच्याविरूध्द गु.र.नं. ३५०/२०२३ हा पोलीस स्टेशन आसेगाव येथे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम १८८ नुसार गुन्हा नोंद झाला. तसेच दिनांक १८.३.२०२५ रोजी सुध्दा पंचनाम्याव्दारे संबंधीत रस्ता मोकळा करुन सुरु झालेला आहे आणि प्रतिवादी क्र. १ व २ हे त्या रस्त्याने जावून त्यांच्या शेतीची वहिती करतात. तसेच या दाव्यात वादींनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना कोठून रस्ता उपलब्ध आहे, याबाबत काहीही नमुद केलेले नाही. संबंधीत सर्व आदेश हे वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतरच पारीत झालेले आहेत. तसेच वादींनी एकाही पंचनाम्यास आव्हान दिलेले नाही. वादींच्या हरकतीमुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांची जमीन २०२१ ते २०२५ पर्यंत पडीत होती त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांचे खूप नुकसान झालेले आहे. दिनांक १८.३.२०२५ रोजीच्या पंचनाम्यानुसार संबंधीत रस्ता खुला झाला असल्यामुळे वादींच्या जमिनीतून नवीन रस्ता तयार करण्याचा प्रश्नच येत नाही. तसेच यापुर्वी सुध्दा दिनांक २७.४.२०२३, २१.६.२०२४ आणि १८.३.२०२५ रोजी संबंधीत रस्ता हा पोलीस संरक्षणात मोकळा केलेला आहे. त्यामुळे वादींना प्रथम दर्शनी केस नाही म्हणून वादींचे तात्पुरत्या मनाईचे अर्ज नामंजूर करण्यात यावेत.

८) वादींच्या आणि प्रतिवादींच्या विधिज्ञांचा उपरोक्त युक्तीवाद विचारात घेतला तर वादींच्या म्हणण्यानुसार दिनांक १८.३.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांच्याशी संगणमत करुन जेसीबीव्दारे वादींच्या शेतीचा १० फुटाचा बांध फोडला काय ? अथवा प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या म्हणण्यानुसार दिनांक १८.३.२०२५ रोजीच्या पंचनाम्यानुसार पोलीस बंदोबस्तात तो रस्ता मोकळा केला ? यापैकी दिनांक १८.३.२०२५ रोजी नेमके काय घडले, हे विचारात घेणे आवश्यक आहे.

९) वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा उपरोक्त युक्तीवाद आणि वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विधीज्ञांनी दाखल केलेली उपरोक्त कागदपत्रे विचारात घेतली तर या दाव्यापुर्वी वादी व प्रतिवादी यांच्यात रस्त्याच्या अनुषंगाने खालील प्रकरणे दाखल झाली होती व निकाली निघाली होती, ही बाब वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांना कबूल आहे आणि त्या सर्व प्रकरणांचा तपशील खालील प्रमाणे आहे,

| अ.क्र | प्रकरण दाखल केलेले अधिकारी व प्रकरणाचा क्रमांक | अर्जदार/वादी | गैरअर्जदार/ प्रतिवादी | आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | मामलतदार मंगरूळपीर क्र. रा.मा.क्र.एमसीए-०५/चिखलागड/०६/ २०२०-२१ | अरविंद जाधव व अमोल जाधव | किशोर जाधव, विजय जाधव, पंचफुला जाधव आणि इतर. | आदेश दि.०४/०१/२०२२ |
| २. | मामलतदार मंगरूळपीर क्र. रा.मा.क्र.एमसीए-०५/चिखलागड/०६/ २०२०-२१ | अरविंद जाधव व अमोल जाधव | किशोर जाधव, पंचफुला जाधव आणि शामराव जाधव | सुधारीत आदेश दि.१०/०८/२०२२ |
| ३ | उपविभागीय अधिकारी मंगरूळपीर क्र. रा.मा.क्र.एमसीए-०५/चिखलागड/०४/ २०२१-२०२२ | शामराव जाधव, प्रताप जाधव, सौ.पंचफुला जाधव. | अरविंद जाधव, अमोल जाधव व इतर. | आदेश दि.०५/०७/२०२३ |
| ४. | मामलतदार मंगरूळपीर क्र. रा.मा.क्र.एमसीए-०५/चिखलागड/०६/ २०२०-२१ | अरविंद जाधव व अमोल जाधव | किशोर जाधव, विजय जाधव, पंचफुला जाधव आणि इतर. | आदेश दि.२३/०१/२०२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | उपविभागीय अधिकारी मंगरूळपीर क्र. रा.मा.क्र.एमसीए-०५/चिखलागड/०३/ २०२३-२०२४ | सौ.पंचफुला जाधव, शामराव जाधव व प्रताप जाधव, | अरविंद जाधव, अमोल जाधव व इतर. | आदेश दि.२७/२/२०२५ |

१०) उपरोक्त रकाना विचारात घेतला तर असे दिसून येते की, वादी आणि प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यामध्ये एकुण पाच उपरोक्त आदेश पारीत झालेले आहेत.

११) प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कागदपत्रांची यादी निशाणी ४९ अन्वये दिनांक १८.३.२०२५ रोजीच्या पंचनाम्याची सत्यप्रत दाखल केलेली आहे. त्या सत्यप्रतीचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, तो पंचनामा करण्यासाठी श्री. एस.एस.सातंगे नायब तहसिलदार, श्री. के.के. पांडे मंडळअधिकारी, श्री. राहुल भगत तलाठी, श्री. अमर शिंदे तलाठी, श्री. लोंढे तलाठी तसेच अर्जुन राठोड पोलीस निरीक्षक, देविदास पत्रे पोलीस उपनिरीक्षक, महादेव सोळंके ए.एस.आय आणि सहा होमगार्ड हे हजर होते. तसेच त्या पंचनाम्यावर या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ अरविंद जाधव आणि इतर अशा एकूण १९ जणांच्या सहया आहेत. तसेच त्या पंचनाम्यानुसार गैरअर्जदार मनिष शामराव जाधव हे सुध्दा हे हजर होते. त्या सर्व महसूल अधिका–यांनी पोलीस बंदोबस्तात मौजे चिखलागड येथे गट क. १८७ च्या उत्तर दक्षिण असा पुर्वेकडील धु–याने पुर्व दक्षिण कोप–यावरील काट्या, गोटे, लाकडे टाकून अडविलेला रस्ता पोलीस बंदोबस्तात मोकळा केला आहे. तो पंचनामा दुपारी १२.३० वाजता सुरु करुन दुपारी २.०० वाजता संपलेला आहे.

१२) वादींनी प्रस्तुतचा दावा दिनांक १५.३.२०२५ रोजी दाखल केलेला आहे आणि वादींनी तात्पुरता मनाईचा अर्ज निशाणी क्र. २६ हा दिनांक १८.३.२०२५ रोजीच्या रस्ता मोकळा करण्याच्या अनुषंगाने दिनांक ७.५.२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

१३) दिनांक १८.३.२०२५ रोजीच्या पंचनाम्याची प्रत विचारात घेतली तर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांच्याशी संगणमत करून जेसीबीव्दारे १० फुटाचा वादींच्या शेतीचा बांध फोडून नवीन रस्ता करण्याचे कृत्य केले, हे वादींनी प्रथमदर्शनी योग्य त्या वादकथनाच्या व कागदोपत्री पुराव्याच्या आधारे सिध्द केलेले नाही. याउलट, दिनांक १८.३.२०२५ रोजीच्या पंचनाम्यानुसार पोलीस बंदोबस्तात रस्ता मोकळा केला, हे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी योग्य त्या वादकथनाच्या व कागदोपत्री पुराव्याच्या आधारे प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे असे दिसून येते. त्यामुळे वादींच्या म्हणण्यानुसार दिनांक १८.३.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांच्याशी संगणमत करुन जेसीबीव्दारे वादींच्या शेतीचा १० फुटाचा बांध फोडला असे म्हणता येवू शकत नाही, याउलट प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या म्हणण्यानुसार दिनांक १८.३.२०२५ रोजीच्या पंचनाम्यानुसार पोलीस बंदोबस्तात तो रस्ता मोकळा केला हे घडल्याचे असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादींना प्रथमदर्शनी केस नाही, असे म्हणावे लागते तसेच न्यायाचा समतोलही वादींच्या बाजुने दिसून येत नाही. त्यामुळे तात्पुरती मनाई दिली नाही तर वादींचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल, असे म्हणता येवू शकत नाही. तात्पुरत्या मनाईच्या अर्जाच्या अनुषंगाने असलेल्या उपरोक्त तिन्ही बाबी वादींनी योग्य त्या वादकथनाच्या आणि पुराव्याच्या आधारे प्रथमदर्शनी सिध्द केलेल्या नाहीत. त्यामुळे या परिस्थितीत, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेविरूध्द तात्पुरता मनाईचा विवेकाधीन अनुतोष (discretionary relief) मिळण्यास वादी हे पात्र ठरत नाहीत, आणि प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते.

१४) उपरोक्त सर्व परिस्थिती,दिनांक २७.४.२०२३ रोजी जेसीबीव्दारे रस्ता खुला केलेल्या पंचनाम्याची छायांकीत प्रत,दिनांक १७.७.२०२२ व २७.४.२०२३ रोजी शेती रस्ता मोकळा करण्यासाठी पोलीस बंदोबस्त मिळावा म्हणून रक्कम जमा केलेल्या दोन पावत्यांच्या छायांकीत प्रती, दिनांक

२३.१.२०२४ रोजीच्या मामलतदार मंगरुळपीर यांच्या आदेशाची सत्यप्रत, उपविभागीय अधिकारी मंगरुळपीर यांच्या दिनांक २७.२.२०२५ रोजीच्या आदेशाची सत्यप्रत, दिनांक १८.३.२०२५ रोजीच्या पंचनाम्याची सत्यप्रत आणि प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विधीज्ञांचा उपरोक्त युक्तीवाद हे सर्व एकत्रीतरित्या विचारात घेवून मी मुद्दा क्र.१ ते ३ यांचा निष्कर्ष नकारार्थी देवून न्यायाचे दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१] प्रस्तुतचे तात्पुरत्या मनाईचे अर्ज निशाणी क्र. ५ व २६ हे नामंजूर करण्यात येत आहेत.

२] खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.11.17 15:43:07 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

स्थळ :- मंगरुळपीर

दिनांक : १७.११.२०२५

(ध.भ. हंबीरे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R. Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D.,Mangrulpir |
| Date of Decision | : | 17/11/2025 |
| Order signed by the P.O. on | : | 17/11/2025 |
| Order uploaded on | : | 17/11/2025 |